जाहीर नोटीस

जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस यांचे इमारतीमधील अभिलेख कक्ष क्र.५५ व ६७, मुद्देमाल खोली क्र.५० व ग्रंथालय खोली क्र. ६ व ७ या खोल्यांमध्ये "किटकनाशक व वाळवी प्रतिबंधक" औषध फवारणी अंतर्गत उपाययोजना करणेसाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत.

अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह, तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचे नांवे असावे. सदर लखोटयावर **"किटकनाशक व वाळवी प्रतिबंधक औषध फवारणी अंतर्गत उपाययोजना करणेसाठी दरपत्रक"** असा उल्लेख करणेत यावा.

२) दरपत्रक सादर करणा–या पुरवठादार यांची वस्तू व सेवा करारांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

३) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमुद करावा. तसेच कार्यालयीन दस्तऐवजी तयार करणेसाठी दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, आधारकार्ड, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत व रद्द केलेला धनादेश दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) जंतुनाशक फवारणीचा अभिलेख कक्षातील कागदपत्रांवर, मुद्देमालातील वस्तूंवर व ग्रंथालयातील पुस्तकांवर तसेच तेथे काम करणा–या कर्मचा–यांवर कोणत्याही प्रकारचा अनिष्ट परिणाम होणार नाही तसेच कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची काळजी संबंधित पुरवठादार यांनी घ्यावयाची आहे.

५) पुरवठादार यांनी स्वतःच्या यंत्रसामग्रीने व स्वखर्चाने संबंधित कक्षांमध्ये जावून कार्यालयीन वेळेत फवारणी करावयाची आहे.

६) फवारणी झाल्यानंतर तेथील कपाटे, रॅक, फर्निचर, मुद्देमाल इ. वस्तू सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार यांची राहणार आहे.

७) फवारणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देयकाची रक्कम अदा करणेत येईल. सदरची देयके ही प्रत्येक फरवाणी करीता वेगवेगळी राहतील याची दखल घेणेत यावी.

८) जाहीर नोटीसीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

९) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचा राहील.

तरी, इच्छुक पुरवठादार यांनी आपली दरपत्रके **दि.०९/०६/२०२६** पर्यंत आपली दरपत्रके या कार्यालयाकडे सादर करावीत.

03/06/2026

दिनांकः- ०३/०६/२०२६

सहाय्यक अधीक्षक(वित्त)
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

******

म.जा.क्र.ग्रंथा./३०६७ सन २०२६
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस
दिनांकः-०३/०६/२०२६

प्रत माहितीसाठी व कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी सविनय सादर-

१. मा. दिवाणी न्यायाधीश(व.स्तर), सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश(क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई-मेल द्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
७. मा. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस यांचे नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर
८. डी.एस.ए. , जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता